# 'गुरुकुल'च्या विद्यार्थ्यांनी लुटला देशभक्तीचा आनंद

नांदेड, दि. ४ : पुणे येथील कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेच्या 'ओळख देशभक्तांची, शाळा तेथे क्रांती मंदिर' या उपक्रमाचे आयोजन नांदेड जिल्हा विद्याभारती शिक्षा संस्थानच्या वतीने हनुमान पेठ भागातील गुरुकुल इंग्रजी शाळेत करण्यात आले होते.



क्रांतिकारकांच्या या छायाचित्राच्या प्रदर्शनात मराठवाड्यातील क्रांतिकारक, गदरचे क्रांतिकारक, अंदमान, प्रतिसरकार, स्वातंत्र्यवीरांचे विविध पोस्टाचे स्टॅम्प, आदिवासी क्रांतिकारकांची सचित्र माहिती व भारतातील विविध प्रांतातील १८५७ पूर्वीच्या देखील देशभक्तांची माहिती असे दुर्मिळ देशभक्तांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन विद्यार्थी व शिक्षकांनी अवलोकन केले. गुरुकुल विद्यालयाच्या प्राचार्या सौ. वैशाली कुलकर्णी यांनी असा प्रकारची देशभक्तांची छायाचित्र यापूर्वी आम्ही कधीही पाहिली नव्हती. हा ऐतिहासिक ठेवा असल्याचे सांगितले. हा क्रांतिकारकांचा ऐतिहासिक ठेवा डिजिटल स्वरूपात कर्नाळा ट्रस्टच्या विद्याभारतीचे जिल्हाध्यक्ष देवदत्त देशपांडे यांच्या हस्ते गुरुकुल विद्यालयाकडे सुपूर्द करण्यात आला. कर्नाळा ट्रस्टचे अध्यक्ष चंद्रकांत शहाणे यांनी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात त्यांनी संकलित केलेली ही अनमोल माहिती समाजाला समर्पित केली आहे. दि. १ ऑगस्टपासून सुरू असलेल्या या प्रदर्शनीचा नांदेड जिल्ह्यातील शारदा अण्णा भाऊ साठे माध्यमिक विद्यालय मुखेड, एस.जी.जी. विद्यालय, गोणार येथील विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. दि. १६ ऑगस्टपर्यंत ही प्रदर्शनी जिल्ह्यात आहे. त्याचा काळात त्यातील शाळांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्या भारती शिक्षा संस्थान जिल्हा नांदेडच्यावतीने करण्यात आले आहे.